**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१२७२ अ/०२**

**श्री.चंद्रभान कमल ठाकूर**
**बिल्डींग नं.१४२-डी, १ ला मजला,**
**रूम नं.२, लालबावा मंदिर,**
**भुलेश्वर रोड, मुंबई ४०० ००२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**न्यास नोंदणी कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,**
**२ रा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**न्यास नोंदणी कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,**
**२ रा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चंद्रभान कमल ठाकूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०१.२००८ रोजी अर्ज करुन गोस्वामी श्री.घनश्यामलालजी महाराज चीमणलालजी वल्लभीया पुष्यातीमार्गीय धार्मीक विश्वस्ताबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी व्यवस्थापन समिती व मालमत्तेसंबंधी अपीलकर्त्यास अनुसूचि १ ची प्रत दि.०५.०४.२००८ रोजी दिली. मागील पाच वर्षाच्या हिशोबाबत अपीलकारास सन २००५ व २००७ च्या

हिशोबाच्या प्रती दिल्या सन २००२ ते २००४ व ३१.०३.२००६ या कालावधीतील हिशोबपत्रके लेखाशाखेत उपलब्ध नसल्याने देता येत नाही. व्यासाकडे असलेले भाडे, भाडेकरू, न्यायालयीन प्रकरणे इत्यादि बाबतची माहिती अपीलकाराने व्यासाकडून प्राप्त करुन घ्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१६.०५.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने गोस्वामी घनश्यामलालजी महाराज चीमणलालजी वल्लभीया पुश्यतीमार्गीय धार्मीक न्यासाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी कार्यालयातील उपलब्ध माहिती अपीलकारास पुरविली. दि.३१.०३.२००२ ते दि.३१.०३.२००४ व दि.३१.०३.२००६ या कालावधीतील हिशोबपत्रके लेखाशाखेत उपलब्ध नसल्याच्या कारणावरुन दिली नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर हिशोबपत्रके लेखाशाखेत का उपलब्ध नाहीत याबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी खुलासा केलेला नाही. सदर कालावधीची हिशोबपत्रके प्राप्त करुन घेउन त्याच्या प्रती अपीलकारास पुरवाव्यात. न्यासाकडे असलेले भाडे, भाडेकरू, न्यायालयीन प्रकरणे इत्यादिबाबतची माहिती न्यासाकडून प्राप्त करुन घेण्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. परंतू सदर माहिती न्यासाने अपीलकारास देण्यास नकार दिला आहे. या परिस्थितीत प्रथम अपिलीय प्राधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी यांनी न्यासनोंदणी अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन न्यासाकडील माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १३.०४.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१५२७/०२**

**श्री.रघुनाथ माधव प्रभू**
**टा/बी/स्पे/१६/१६४,**
**सी.जी.एस.कॉर्टर्स,**
**घाटकोपर (प), मुंबई ४०० ०८६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आर्चडिओसीज, बीशप हाउस,**
**एन.पारीख मार्ग, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**आर्चडिओसीज, बीशप हाउस,**
**एन.पारीख मार्ग, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रघुनाथ प्रभू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०१.२००८ रोजी अर्ज करुन दादर, नायगाव विभागातील सीटी सर्व्हे क्र.७०७ येथील सेंट पॉल्स कॉन्हेंट या शाळेच्या प्लॉटबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी व अपीलकार हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन न्यायगाव विभागातील सीटी सर्व्हे क्र.७०७ येथी प्लॉट बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. महानगरपालिकेने सेंट पॉल्स शाळेस मोफत दिलेल्या भुखंडावरील भाडेकरुची यादी व इतर माहिती उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराची मागणी आहे. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलाकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०४.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९९४/०२**

**श्री.विजय दामोदर जगताप**
**इमारत क्र.२४४/९५४१, कन्नमवार नगर,**
**नं.२, विक्रोळी (पू), मुंबई ४०० ०८३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**म्हाडा कार्यालय इमारत, १ ला मजला,**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (III)**
**म्हाडा कार्यालय इमारत, १ ला मजला,**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.विजय जगताप यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०८.२००८ रोजी अर्ज करुन इमारत क्रमांक १४१ कन्नमवार नगर क्र.२, विक्रोळी (पू), मुंबई येथील दुकानाची जागा वाटप केलेल्या लाभधारकाची यादी तसेच अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.०९.०९.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास सुनावणीकरिता हजर नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकाराचे प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचे वेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन कन्नमवार नगर क्र.२ विक्रोळी येथील दुकानाची जागा वाटप झालेल्या लाभधारकांची यादी मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमाच्या अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. दि.२१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपीलकाराच्या वैयक्तिक अडचणीमुळे अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता हजर राहू शकले नाहीत असे मुध्दा अपीलकाराने व्दितीय अपीलात नमुद केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे ओदश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी व आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकारास हक्क अबाधित राहील.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १३.०४.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१५६१/०२**

**श्री.भीष्म कृष्ण नारकर**
**४६/बी-२०, ओल्ड चिखलवाडी,**
**टी.जे.रोड, मुंबई ४०० ००७.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**एम.बी.आर.आर.बी.**
**म्हाडा, मु.इ.दु.व पु.मंडळ,**
**दादर (प), मुंबई ४०० ०१४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**एम.बी.आर.आर.बी.**
**म्हाडा, मु.इ.दु.व पु.मंडळ,**
**दादर (प), मुंबई ४०० ०१४.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.भिष्म नारकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.१२.२००७ रोजी अर्ज करून आय व्यय आणि किंमतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने संबंधीत फाइलचे निरीक्षण करावे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१३.०२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२६.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचे वेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन जुनी चीकलवाडी सी.एस.क्र.३०९ एमबीआरआरबी संदर्भात उत्पन्न व खर्चाच्या लेख्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने संबंधीत फाईलचे निरीक्षण करण्याबाबत अपीलकारास कळविले. माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात तरतुद आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करुन आवयकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहिल.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०४.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२००८/०२**

**श्री.अशोक तालेकर**
**विठ्ठलवाडी, अंधेरी (प),**
**मुंबई ४०० ०५३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृह निर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृह निर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अशोक तालेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०९.२००८ रोजी अर्ज करून सीटी सर्व्हे क्र.८५३ (पीटी), ८३६ (पीटी), ८३९/१ (पीटी) आणि ८३९/२ (पीटी) अंबीवली गाव आझादनगर, अंधेरी (पूर्व) मुंबई येथील झोपडपट्टी सुधार योजनेतंर्गत (M/s K.S. Chamankar Enterprises) विकासक आणि झोपडधारकामध्ये झालेल्या कराराच्या प्रतीची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

६८ झोपडीधारकांनी दिलेल्या संम्मतीपत्राची प्रत विहित शुल्क भरुन प्राप्त करून घ्यावी. ६८ झोपडीधारकांनी विकासकाबारोबर केलेल्या करारपत्राचे स्वरुप मोठे असल्याने कार्यालयात हजर राहून संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण करावे त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या प्रती देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी दि.२३.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२२.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२२.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकार हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन विकासक व ६८ झोपडपट्टीधारक यांचेमध्ये झालेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालयात झोपडपट्टीधारकांच्या संम्मतीपत्राच्या प्रती उपलब्ध आहेत. विहित शुल्क भरुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत प्राप्त करुन घेणेबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच विकासक आणि ६८ झोपडीधारक यांचेमध्ये झालेल्या करारपत्राचे स्वरुप क्पिूल प्रमाणात असल्याने कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्राचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीनुसार आवश्यक कागदपत्राच्या छायांप्रती देण्यात येतील असे जन माहिती अधिका-याने वरील पत्रान्वये अपीलकारास कळविले आहे. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी संम्मतीपत्र / करारपत्राच्या प्रती दिल्या नसल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी आवश्यकती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०४.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२००७/०२**

**श्री.विशाल रामदास भोगे**
**रूम नं.३०६, बिल्डिंग नं.१०१,**
**न्यू म्हाडा कॉलनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,**
**मानखुर्द, मुंबई ४०० ०४३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (३)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.विशाल भोगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०६.२००८ रोजी अर्ज करुन सुभाषनगर, चेंबूरच्या मंडळाच्या मोकळया जागेत श्री.ॲन्थोनी देवजी सॅबेस्टीन / सौ.हेलन ॲन्थोनी सॅबेस्टीन यांनी अनधीकृत बांधकाम करुन व्यवसाय करित असल्याबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची मागणी केली होती.

अनधीकृत बांधकामाची भाडेवसूलीकाराकडून तपासणी करुन कारवाई करण्यात येईल. मागीतलेली कागदपत्रे नस्तीतील उपलब्ध कागदपत्रावरुन विहित शुल्क भरणा केल्यावर पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२२.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०३.२००९ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सुभाषनगर चेंबूर येथील मंडळाच्या जागेतील अनधीकृत बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास क्र.४९८, दि.११.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. श्री.ॲन्थोनी सॅबेस्टीन व हेलन सॅबेस्टीन यांना मंजूर फोटोपास दिलेल्या जागेव्यतिरिक्त अनधीकृत केलेले अतिरिक्त बांधकाम तोडण्यात आलेले आहे असे अपीलकारास कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी आवश्यक माहिती अपीलकारास प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०४.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९९६/०२**

**श्री.अब्दुल रहीम बुखारी**
**५७/ए, रूखसाना प्लेस, ४ था मजला,**
**मोहम्मद अली रोड, मुंबई ४०० ००३. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृह निर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृह निर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अब्दुल बुखारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.०८.२००८ रोजी अर्ज करून नासरवानजी वाडी येथील प्लॉट क्र.४८४-ए पीतांबर लेन माहिम, मुंबई १६ या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचे वेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन प्लॉट क्र.४८४-ए पीतांबर लेन माहिम बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिल नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

<u>**आदेश**</u>

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०१३/०२**

**श्री.धनराज श्रीराम सांळुखे**
**श्री गणेश नगर, के एन.गायकवाड मार्ग,**
**निलकंठेश्वर मंदीराच्या बाजुला, चेंबूर,**
**साळुंखे चाळ, मुंबई ४०० ०७१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रशाकीय अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,**
**प्रिर्य दर्शिनी पार्क जवळ, देना बँकेच्या मागे,**
**नेपियन्सी रोड, मुंबई ४०० ०३६.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन विभाग**
**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,**
**प्रिर्य दर्शिनी पार्क जवळ, देना बँकेच्या मागे,**
**नेपियन्सी रोड, मुंबई ४०० ०३६.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.धनराज साळुंखे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०९.२००८ रोजी अर्ज करुन मुख्य महाव्यवस्थापक व महाव्यवस्थापक या पदाच्या भरतीकरिता वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिरातीबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२०.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१२.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन केले. तसेच अपीलकारास दि.२५.११.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील

दाखल केले.  सदर अपीलावर दि.०४.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मुख्य महाव्यवस्थापक व महाव्यवस्थापक पदाच्या भरतीकरिता वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  सदरपदाच्या नियुक्तीसाठी मुलाखीतीची जाहिरात टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रसमुहाच्या वर्तमानपत्रात देण्याचे निश्चित झाले होते.  या पॅकेज मध्ये भारतातून या समुहाच्या प्रसिध्द होणा-या एकूण १९ इंग्रजी आवृत्या (टाईम्स ऑफ इंडिया ११, इकॉनॉमिक टाईम्स ८) ३ हिंदी आवृत्या व केवळ १ मराठी आवृत्ती (महाराष्ट्र टाईम्स) यांचा समावेश होतो.  या पॅकेजअंतर्गत दिलेली एकच जाहिरात भारतभर अशा एकूण २३ वर्तमानापत्रातून प्रसिध्द होतात.  अशी दि.२५.११.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली.  महामंडळाने जाहिरात मराठीत का प्रसिध्द केली नाही.  त्याचा खुलासा विचारलेला आहे.  माहितीचा अधिकार अधिनियमात खुलासा वजा स्पष्टीकरण करणे अपेक्षित नाही.  तरी देखील प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास संक्षीप्त स्वरुपात माहिती दिली असल्याचे सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.  यावरुन सदर प्रकरणी अर्जावर जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास समर्थक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.  सबब मी खालीलप्रमाणे आदेश देता आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३/०२**

**श्री.मुलचंद दशरथ यादव**
**केळेवाडी चाळ, चाळ नं.२२५/बी,**
**रूम नं.५४, फर्ग्युसन रोड,**
**लोअर परेल, मुंबई ४०० ०१३. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग, म.ज्योतीराव फुले मंडई,**
**१ ला मजला, डॉ.डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग, म.ज्योतीराव फुले मंडई,**
**१ ला मजला, डॉ.डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.मुलचंद यादव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन सन १९७८ साली लोअर परेल येथील सर्वश्री मुलचंद यादव आणि जनता काशी यादव यांना टी.एम.पी.पीच परवाना देण्यात आला होता याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी (जी/दक्षिण व बाजार खाते) दिलेली माहिती विसंगत असल्याने योग्यती माहिती द्यावी म्हणून अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास आदेश मिळाल्यापासून ७ दिवसात माहिती द्यावी असे आदेश पारित केले. सदर आदेशानुसार माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०२.२००९

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.मुलचंद यादव व जनता काशी यादव यांना देण्यात आलेल्या टीएमपी पीच परवानाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. स्पष्टपणे कोणत्याही कागदपत्राची मागणी न करता, स्पष्टीकरणात्मक / खुलाशात्मक स्वरुपाची अपीलकारास पुरविणे अधिनियमाच्या एकंदरीत तरतुदी पाहता सुसंगत ठरत नाही. सदर प्रकरणी अपीलकाराचा अर्ज त्या स्वरुपाचा आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी समर्थक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सदर प्रकरणी मा.न्यायालयाने रिट याचिका क्र.७१७/९७ मध्ये अर्जदारांना जबरदस्तीने दुस-या जागेवर प्रस्तापीत करणे हा वाद अर्जदार व मुंबई महानगरपालिकेचा असून त्यांनी आप आपसात मिटवावा असे मा.न्यायालयाने आदेश दिले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १५.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९९५/०२**

**श्री.भूषण भगवानदास घोडी (पटेल)**
**भगवानदास हाउस, सी/१६ चिंचोली बंदर रोड,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रे (पु),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रे (पु),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.भूषण घोडी (पटेल) यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०९.२००८ रोजी अर्ज करून मौजे मालाड ता.बोरीवली न.भू.क्र.१११४ सर्वे क्र.४४३/२ या अपीलकाराच्या मीळकतीमधून होणारे रोड कटींगबाबत व एमयुटीपी क्र.१८ मॅप क्र. ची कागदपत्र व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दिनांक २२.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपीलकार हजर होते.

सुनावणीचे वेळी अपीलकराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मालाड, ता.बोरीवली भु.क्र.१११४ सर्वे क्र.४४३/२ सदरच्या अपीलकाराच्या मिळकतीमधून रोड कटिंगमध्ये अपीलकाराची जागा जाणार असल्याने एम.एम.आर.डी.ए चा नकाशा क्र.०८ एमयुटीपी क्र.१८ च्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रती व संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण करण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे.

सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितची अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणीचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १५.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१७३९/०२**

**श्री.सुमिर एम.डेंबला**
**ऐ-२०२, गोदावरी शांतीवन,**
**बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता,**
**ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
**ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये,**
**मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सुमिर डेंबला यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०६.२००८ रोजी अर्ज करुन ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई येथे रँगींग चालत असल्याबाबतची अनुषंगीक माहिती मागीतली होती.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे महाविद्यालयाने ॲन्टी रँगीग समितीमार्फत सखोल चौकशी करण्यात आली. महाविद्याल्यामध्ये कोणत्याही प्रकारचि रँगीग झाली नसल्याचे समिती अहवाल दिला आहे. कार्यालयातील उपलब्ध कागदपत्राच्या छाया प्रती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३०.०६.२००८ रोजी उपलब्ध करुन दिल्या. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२१.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०८.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे दि.१९.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन महाविद्यालयात रँगींग चालत असल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. ॲन्टी रँगींग समितीने केलेल्या चौकशीनुसार महाविद्यालयात रँगीग चालत नाही असे अपीलकारास कळविण्यात आले आहे. तसेच उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिल्या आहेत. अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदरप्रकरणी अवश्यकती माहिती अपीलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १५.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१०६९/०२**

**श्री.विजयकुमार रामदास परबत**
**यशवंत नगर, माठा रोड,**
**कर्डूवाडी, ता.माठा, जि.सोलापूर ४१३ २०८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट,**
**एम.एन.रॉय, हूमन डेव्हलपमेंट कॅम्पस, प्लॉट नं.६,**
**एफ ब्लॉक गर्व्हमेंट कॉलनीसमोर, बिंल्डींग नं.३२६,**
**टी.पी.एस.रोड.नं.१२, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
**ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट,**
**एम.एन.रॉय, हूमन डेव्हलपमेंट कॅम्पस, प्लॉट नं.६,**
**एफ ब्लॉक गर्व्हमेंट कॉलनीसमोर, बिंल्डींग नं.३२६,**
**टी.पी.एस.रोड.नं.१२, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विजयकुमार परबत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, बांद्रा यांच्याकडे एल.जी.एस.परीक्षेसंदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने संस्थेच्या प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी, अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडे एल.जी.एस परीक्षेसंदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर संस्थेस शासनाकडून अर्थसहाय्य मिळत नाही. सदरबाब लक्षात घेता उक्त अधिनियमातील कलम २ मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत सदर संस्था बसत नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेस लागू होत नाही असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. अखील भारतीय स्थानिक संस्थेस शासनाकडून अर्थसहाय्य / अनुदान दिले जात नाही. सदर बाब लक्षात घेता संस्थेने अपीलकारास फेरबद्दल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १५.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२०१/०२**

**श्री.एन.एस.ठाकूर**
**अंबड पोलीस स्टेशन मागे,**
**सिडको, नाशिक ४२२ २०९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई**

**जन माहिती अधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एन.एस.ठाकूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.१२.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अर्जदार श्री.राम पवार, अध्यक्ष ठाकूर समाज सेवा मंडळ जि.नाशिक यांनी जन माहिती अधिका-याकडे दि.०७.०६.२००६ रोजी अर्ज करुन ठाकर, ठाकूर जमातीच्या दाव्याच्या पडताळणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१९ जुर्ले, २००६ च्या पत्रान्वये अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अर्जदार श्री.राम पवार यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०४.०८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) व २ (झ) मधील तरतूदीनुसार प्रश्नार्थक, मतप्रदर्शन किंवा अभिप्राय अशाप्रकारची माहिती देणे अपेक्षीत नाही. त्यामुळे अपील अर्जात नमुद मुध्दे केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियामाच्या तरतुदीत मोडत नाहीत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अर्जदारास दि.२२.०९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नाही तर श्री.राम पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतू सदर

प्रकरणी श्री.एन.एस.ठाकूर, कायदे सल्लागार, ठाकूर समाज सेवा मंडळ, जिल्हा नाशिक यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जदार यांनी ठाकर, ठाकूर जमातीच्या दाव्याच्या पडताळणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जमाती दाव्याच्या पडताळणी समितीवर मानववंशशास्त्र / समाजशास्त्र पदव्युत्तर पदव्या प्राप्त संशोधन अधिकारी नेमल्याबाबत, जातीचे दाखले देणे व ते पडताळणे याबाबत महाराष्ट्र शासनाचे २००३ चे नियम व मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली कार्यपध्दती यामध्ये असलेल्या तफावती बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. याबाबत श्री.राम पवार अर्जदारास सविस्तर माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तसेच सदर प्रकरणी अर्जदार श्री.राम पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले नाही. श्री.एन.एस.ठाकूर यांनी व्दितीय अपील केले असल्याचेही जन माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. सदर परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२१८९/०२**

**श्री.नागनाथ शिवपुंजे**
**भंसाली एस.ए.अर को.हौ.सो.,**
**५/५०७, हनुमान रोड, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** .... अपीलकार

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त,**
**अन्न व औषध प्रशासन,**
**वांद्र-कुर्ला संकुल, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**अन्न व औषध प्रशासन,**
**वांद्र-कुर्ला संकुल, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अपीलकार श्री.नागनाथ शिवपुंजे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन दुधातील भेसळीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१४.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१३.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन दुधातील भेसळीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे.  सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले होते.  परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत.  माहिती दिली नाही असे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत.  यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १८.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२१९९/०२**

**श्री.अनिल थरथरे**
**जयंत प्रोव्हीजन स्टोअर, शॉप नं.९,**
**आराम शॉपींग सेंटर संत ज्ञानेश्वर मार्ग,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी ,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**(म्हाडा), वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**(म्हाडा), वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अनिल थरथरे, श्रीसुरेश गावडे व श्री.जयंतीलाल शाह यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२४.०१.२००८ रोजी अर्ज करुन सीटी सर्व्हे क्रमांक ६२९ (पीटी) बांद्रा (पू) येथील परिसराम सहकारी गृहनिर्माण संस्था आणि शास्त्रीनगर म्युनसीपल व्यापारी सेवा संघाचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत विकासीत करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१६.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, अपीलकार हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन परिसराम सहकारी गृहनिर्माण संस्था आणि शास्त्रीनगर म्युनसीपल व्यापारी सेवा संघाचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत विकसीत करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.

या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९९८/०२**

**श्री.दत्ताराम कृष्णा पेडामकर व इतर**
**मरीअम्मा नगर रूम नं.३३ एम.२२३,**
**नेहरू सेंटर मागे डॉ.ए.बी.रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०१८.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**(म्हाडा), वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**(म्हाडा), वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.दत्ताराम कृष्णा पेडामकर व इतर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.०८.२००८, दि.२५.०८.२००८ व दि.२५.०९.२००८ रोजी अर्ज करून एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सी.एस.क्र.४७ (पार्ट) ऑफ लोअर परेल विभाग, वरळी मुंबई बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.३१.१०.२००८, दि.०६.०९.२००८, दि.२६.०९.२००८ व दि.३०.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी आयोजित करून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर दि.०३.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मरीअम्मानगर एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २१.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२१९/०२**

**श्री.प्रविण विरजी सोलंकी**
**रुम क्र.८, न्यु बावन चाळ,**
**वीर तानाजी मालुसरे मार्ग,**
**काळाचौकी, मुंबई ४०० ००२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**९ हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी.स्टेशन समोर,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्य मानवी हक्क आयोग,**
**९ हजारीमल सोमाणी मार्ग,**
**सी.एस.टी.स्टेशन समोर,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रविण सोलंकी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन राज्य मानवी हक्क आयोग कार्यालयातील शिपाई पदाकरिता अपीलकाराने अर्ज केला होता. अपीलकारास शिपाई पदाच्या मुलाखतीकरिता का? बोलावण्यात आले नाही याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.१२.२००८ च्या पत्रानुसार मुध्देनिहाय माहिती दिली. मागीतलेली माहिती एक महिन्यात मिळालेली नाही. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.२३.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे

व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय दाखल केले.  सदर अपीलावर दि.१६.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन शिपाई पदावरील नेमणूकीकरिता राज्य मानवी हक्क आयोगाने घेतलेल्या मुलाखीतीकरिता अपीलकारास का बोलावण्यात आले नाही याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे.  सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.

या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी.  आवश्यकते आदेश पारित करावेत.  यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २१.०४.२००९.** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३४९/०२**

**श्री.एम.एच.खान**
**२१/७२, ओशिवारा सागर अपार्टमेंट,**
**कामत क्लब समोर, लोखंडवाला कॉम्प्लेक्स,**
**ओशिवारा, मुंबई ४०० ०१२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन,**
**३ रा मजला, खो क्र.४०४, कलानगर, वांद्रे (पु),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक भुव्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन,**
**३ रा मजला, खो क्र.४०४, कलानगर, वांद्रे (पु),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एम.एच.खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१६.०८.२००८ रोजी अर्ज करून ओशीवरा सागर मधील सदनिकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती १५ दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यास आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकारा हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन ओशीवरा सागर अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्थेतील इमारत क्र.२१, २२, ३३ मध्ये एकूण ८४ सदनिका आहेत. किती सदनिकाधारकांनी म्हाडाकडे परिरक्षा (Maintainence) भरलेले आहे. किती सदनिकाधारकांनी परिरक्षा (मेन्टन्न्स) भरलेले नाही, सबंधीत सदनिकाधारकांची नावे प्रलंबित परिरक्षा खर्चासाठी म्हाडाने मागणीपत्र पाठविले आहे काय? संस्थेने म्हाडाकडे किती रक्कमेचा भरणा केला आहे इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती देणेबाबत जन माहिती अधिका-यांना प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर जन माहिती अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिताही जन माहिती अधिकारी हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग करणारी आहे. तेव्हा यासाठी जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती का लादण्यात येत नये याबाबत जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २१.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३५३/०२**

**श्री.रमेश मधुकर साळवे**
**सुरजी वल्लभदास चाळ,**
**विक्रोळी (पू), मुंबई ४०० ०८३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रमेश मधुकर साळवे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.१२.११.२००८ रोजी अर्ज करून एम.एम.आर.डी.ए प्राधिकरणात सामाजिक कार्य करणारी सेवाभावी संस्था स्पार्क महाराष्ट्र शासन अधिन नोंदणीकृत आहे किंवा नाही. तसेच स्पार्क ही संस्था महाराष्ट्र शासन अधिन नोंदणीकृत असल्यास त्याची नोंदणी दिनांक व नोंदणी क्रमांक मिळणेबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे दि.२८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन एम.एम.आर.डी.ए प्राधिकरणातील स्पार्क संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे.  सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  अपीलकारास माहिती दिली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत.  यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९९३/०२**

**श्री.सुहास उत्तम शिंदे**
**प्लॅट नं.१०१, ए मेहुल अपार्टमेंट,**
**सेक्टर नं.३, एरोली, नवी मुंबई ४०० ७०८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**एक्झामिनर, बुक्स ॲन्ड पब्लीकेशन्स्,**
**जुने जकात घर, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रमेश मधुकर साळवे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०४.०९.२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्रातील वर्तमानपत्राचे शासनमान्य जाहिरात यादीमध्ये समाविष्ठ करण्यासाठी होणा-या पडताळणी संबंधी अनुषंगीक ५ मुद्यावर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे दि.१३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन राज्यातील वर्तमानपत्राचे शासन मान्य जाहिरात यादीमध्ये सामाविष्ठ करण्यासाठी होणा-या पडताळणी संबंधी अनुषंगीक ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मुध्देनिहाय सविस्तर माहिती अपीलकारास दि.०८.१०.२००८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिता अपीलकार हजर नव्हते. सदर प्रकरणी अपीलकाराच्या मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२०३/०२**

**श्री.राजाराम सखाराम काते**
**श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**आर.बी.चांदोरकर मार्ग, आग्रीपाडा,**
**मुंबई ४०० ०११.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त,**
**महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तारित इमारत,**
**३ रा मजला, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तारित इमारत,**
**३ रा मजला, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.राजाराम सखाराम काते यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२१.०८.२००७ रोजी अर्ज करुन आग्रीपाडा येथे एकूण सहा इमारतीच्या पुनर्विकासाचे काम चालू असून आठ इमारतीच्या दुरुस्तीचे काम चालू आहे. असे असता या विभागातील लोकांनी मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या नावाचा उल्लेख करुन एक परिपत्रक काढून ते विभागात वाटण्यात आले त्यांसदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे दि.१९.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास ७ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन

देणेबाबत जन माहिती अधिका-यांना प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी / अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रातील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन अग्रीपाडा येथे एकूण ६ इमारतीच्या पुनर्वीकासाचे काम चालू असून आठ इमारतीच्या दुरुस्तीचे काम चालू आहे. असे असता विभागातील लोकांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या नावाचा उल्लेख करुन एक पत्रक काढून विभागात वाटण्यात आले, याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. आवश्यकती माहिती अपीलकारास ७ दिवसाचे आत उपलब्ध करुन देणेबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश देउनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३९२/०२**

**श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया**
**बेला विस्टा, प्लॅट १५, ३ रा मजला,**
**लेक एल.आय.सी. कार्यालयासमोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी**
**दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अर्जुनलाल एम. छाब्रिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करून महिम येथील मच्छीमार संस्थेच्या इमारत क्रमांक २२ मधील सदनिका क्र.११५९ येथे श्रीमती.झैबुनिसा झकेरिया हया जेष्ठ नागरिक राहतात. माहिती येथून त्यांना पायधुनी येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये मानवतेच्या दृष्टीकोनातून सदनिका उपलब्ध करून देणेबाबतच्या मागणीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली आहे.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकाराने प्रतिनिधी हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्रीमती.झैबुनिसा झकेरिया यांना पायधुनी येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये सदनिका मिळण्यासाठी केलेल्या मागणीवरील कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी उपलब्ध आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१७७८/०२**

**श्री.रमेश कोठारी**
**२०/१०, आझाद नगर,**
**वडाळा, मुंबई ४०० ०३१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**२ रा मजला, फलटण रोड,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत,**
**२ रा मजला, फलटण रोड,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रमेश कोठारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.३१.०१.२००८ रोजी अर्ज करून आझाद नगर वडाळा येथील महानगरपालिकेची मालमत्ता डीसीआर ३३ (७) अंतर्गत इस्ट ॲन्ड वेस्ट बिल्डर्स मार्फत पुनर्विकसीत करण्यासंबंधीची अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. माहितीपोटी आवश्यक शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध होईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराने माहितीपोटी रू.१२१२/- इतके शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेतली. जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती एका भागातील आहे. दुस-या भागाचा संम्मतीचा संचाच्या प्रती मिळाल्या नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२.०६.२००८ रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१७.०६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-याने दिली असल्याचे नमुद करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने आझाद नगर वडाळा येथील महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती एका भागाची आहे. दुस-या भागाची संम्मतीचा संचाची प्रत मिळाली नसल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिली असल्याचे व अपीलकार संबंधीत कागदपत्राची पुन्हा पाहणी करण्यास इच्छुक नसल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात नमुद केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, पूर्ण माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने अपीलकाराने कार्यालयातील संबंधीत फाईल्स कागदपत्राची प्रथम पाहणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३५१/०२**

**श्री.बिपीन के.सोलंकी**
**रुम नं.५, शांताराम सकपाल चाळ,**
**खोत कुआ रोड, काला हनुमान,**
**हनुमान पाडा, मालाड (पू),**
**मुंबई ४०० ०९७.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन)**
**एम्.एच.बी, इमातर क्र.३८,**
**पहिला मजला, सिध्दार्थनगर, एस्.व्ही.रोड.,**
**गोरेगांव (प), मुंबई ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन)**
**एम्.एच.बी, इमातर क्र.३८,**
**पहिला मजला, सिध्दार्थनगर, एस्.व्ही.रोड.,**
**गोरेगांव (प), मुंबई ४०० ०६२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.बीपीन के. सोलंकी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०२.०६.२००८ रोजी अर्ज करून मौजे मालाड न.भु.क्र.३९६, ३९६/१ ते ६६, ९३९७, ३९७/१ ते १३ हनुमान पाडा मालाड येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडी यांची मार्गदर्शक तत्वे कोणती याबाबची अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने प्रश्नोत्तर स्वरूपात उत्तर / खुलासा मागीतली आहे. त्याची उत्तरे देणे कायद्यात अभिप्रेत नाही असे कार्यालयाचे मत असल्याचे दि.११.०६.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. तसेच अर्जातील मुध्दा क्र.४ बाबत अधिक माहिती मिळणेकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ५१ यांचेकडे संपर्क साधण्याबाबत कळविले. यामुळे समाधान झाले

नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दिनांक ०७.०७.२००८ रोजी अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक ०६.०८.२००८ व दिनांक ०४.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.०६.२००८ च्या पत्रान्वये बहुतांश माहिती दिली. अपीलकारास जी काही कागदपत्रे हवी असतील ती त्यांनी अभिलेखाची स्वत: तपासणी करुन उपलब्ध असलेल्या कागदपत्राची मागणी करावी असे नमुद करुन दि.०३.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडीधारकाची संम्मतीपत्र घेण्याची मार्गदर्शक तत्वाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागीतलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरूपात असल्याच्या कारणावरुन नाकारली आहे. सदर बाब योग्य नाही. सदर प्रकरणी अपीलकाराने मागीतलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरूपाची असली तरी यासंबंधीची उपलब्ध माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवासाचे आत पुरविण्यात यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३९३/०२**

**श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया**
**बेला विस्टा, प्लॅट १५, ३ रा मजला,**
**लेक एल.आय.सी. कार्यालयासमोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५०. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी**
**दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अर्जुनलाल एम. छाब्रिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करून महिम येथील मच्छीमार संस्थेतील श्री.भोसले, वसूली निरीक्षक, मालमत्ता विभाग आाणि श्री.मंगेश, सफाईगार यांनी इमारत क्रमांक २२/अे मधील सदनिका क्र.११६० चा ताळा तोडून श्री.इकबाल यांना कायदेशिर कागदपत्र नसतांना वाटप केलेबाबत तक्रारीसंबंधी व इतर मुद्यांबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे दि.१२.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकारच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.मंगेश व श्री.भोसले यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीसंबंधी केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहित मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. तर प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहित मिळविण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी उपलब्ध आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी. आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३९५/०२**

**श्री.आर.ऐ.सिंग**
**३ रा मजला, सुनामा हाउस,**
**१४०, ऑगस्ट क्रांती मार्ग,**
**शालीमार हॉटेल समोर,**
**मुंबई ४०० ०३६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मालमत्ता विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**दुसरा मजला, श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्केट इमारत,**
**फलटण रोड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मालमत्ता विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**दुसरा मजला, श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्केट इमारत,**
**फलटण रोड, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.आर.ए.सिंग यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२२.०५.२००८ रोजी अर्ज करुन डॉ.ॲनी बेझेंन्ट रोड, वरळी मुंबई, रस्ता क्रमांक १२, सी.टी.सर्व्हे क्र.९३९, वरळी विभाग, योजना क्र.५८, येथील प्लॉट क्र.८० क्रीस्टल हाउस संबंधीच्या संपूर्ण फाईलची साक्षांकिती छायाप्रत तसेच आराखडयाची प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती.

कागदपत्राच्या छायाप्रती करिता प्रतीप्रत रु.७५/- भरुन कागदपत्राच्या छायाप्रती प्राप्त करुन घ्याव्यात असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले. निरीक्षणाच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी संबंधीत फाईल उपलब्ध करुन दिली नाही. सन १९६० नंतरची आवश्यक कागदपत्र अपीलकारास हवी आहेत. जन माहिती अधिका-यांनी संबंधीत कागदपत्र

निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन दिली नाहीत. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०५.०८.२००८ व दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती प्राप्त करुन घेण्याकरिता आवश्यक शुल्क भरुन प्राप्त करुन घेणेबाबत अपीलकारास प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने वरळी विभाग जी दक्षिण येथील प्लॉट क्र.७९ आणि ८० बाबत सन १९६१ व सन १९८३ नंतरची संबंधीत फाईलच्या साक्षांकित छायाप्रती व आराखडयाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास फाईलचे संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण केल्यानंतर कागदपत्राच्या छायाप्रती विहित शुल्क आकारुन उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. परंतू कागदपत्र दिली नाहीत. प्लॉट क्र.८० बाबतची सन १९८३ पासूनची व प्लॉट क्र.७९ ची सन १९६१ पासूनची कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत. अन्यथा सर्व संबंधीत कागदपत्र उपलब्ध नसल्याबाबत लेखी उत्तर द्यावे अशी अपीलकाराची मागणी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती द्यावी. अपीलकाराने मागीतलेली माहिती कागदपत्रावर उपलब्ध नसल्यास तसा जाणीवपूर्वक निर्णय घेउन हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास कळवावे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २९.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२०२/०२**

**श्री.विश्वास वसंत ताम्हणकर**
**टागोर नगर, चाळ नं.१५६**
**खो.क्र.२५८५, ग्रुप क्र.५/ब,**
**विक्रोळी (पु), मुंबई ४०० ०८३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव / उप सचिव**
**कार्यासन पोल ५ अ,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**कार्यासन पोल ५ अ,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विश्वास वसंत ताम्हणकरण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२४.०९.२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची जाहिरात क्र.८ बॅन्ड मास्टर गट-ब, बृहन्मुंबई पोलीस दल या पोलीस निरीक्षक दर्जाच्या पद भरतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करून बृहन्मुंबई पोलीस दलातील बॅन्ड मास्टर माहिती अधिका-यांनी उशिराने म्हणजे ९० दिवसानंतर अपीलकारास दि.२४.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहिती पूर्ण नसल्याचा मुध्दा अपीलकाराने व्दितीय अपीलात नमूद केला आहे. कार्यबाहुल्यामुळे अपीलकारास माहिती पुरविण्यास विलंब झाल्याबध्दल प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करून दिलगिरी व्यक्त केली. बृहन्मुंबई पोलीस दलात बॅंड मास्तर (पोलीस निरीक्षक) म्हणून श्री.सौदान भवानी सिंग यांची नियुक्ती दि.२९.०३.२००६ च्या शासन निर्णयानुसार केली. श्री.सिंग यांच्या आयोगाने केलेल्या निवडीविरुध्द प्रकरण महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढे मूळ अर्ज क्र.१०४८/२००५ दाखल केला होता. श्री.सिंग यांच्या नियुक्ती न्यायधिकरणाने योग्य ठरविली असल्याचे लेखी अहवाल सादर करुन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीचेवेळी प्रतीपादन केले. सदर प्रकरणी पूर्ण माहिती दिली नसल्याचा अपीलकाराचा दावा आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास प्रथम सर्व संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करून द्यावीत. त्यांनतर अपीलकाराच्या मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरविण्यात याव्यात.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४६७/०२**

**श्रीमती.जयश्री पांचाळ**
**सत्यवान निवास, एवन बेकरी जवळ,**
**हनुमान नगर, गोरेगांव (प),**
**मुंबई ४०० ०९०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुख अभियंता**
**(मध्यवर्ती खरेदी प्राधिकरण)**
**बृहन्मुंबई मनपा, ५६६, ना.म.जोशी मार्ग,**
**भायखळा, मुंबई ४०० ०११.**

**जन माहिती अधिकारी,**
**(मध्यवर्ती खरेदी प्राधिकरण)**
**बृहन्मुंबई मनपा, ५६६, ना.म.जोशी मार्ग,**
**भायखळा, मुंबई ४०० ०११.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती. जयश्री पांचाळ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२८.०७.२००८ रोजी अर्ज करुन १) शालेय पोषण आहाराच्या निविदेत पात्र करण्यात आलेल्या सर्व निविदा धारकांची यादी २) सर्व पात्र संस्था / महिला मंडळ / बचत गट यांचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, नोंदणीचा पत्ता ३) सर्व पात्र संस्था / महिला मंडळ / बचत गट यांनी निविदेसोबत जोडलेले अनुभव प्रमाणपत्र व स्वयंपाकगृहाचे ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती.

निविदेचे अंतिम संस्करण पूर्ण झालेले नसल्याने निविदेवरील प्रक्रीया आद्यापी सुरु असल्याने यादी आद्याप संम्मत / मंजूर झालेली नाही. संस्थाच्या पात्र यादीस अंतिम मंजूरी मिळाल्यानंतर आवश्यक शुल्क आकारुन माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले

नाही तर प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होत्या.

सुनवणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन, सन २२०८-२००९ या वर्षाकरिता महानगरपालिकेच्या शालेय पोषण आहार निविदेत पात्र करण्यात आलेल्या सर्व निविदाधारकांची विभागवार यादी व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. शालेय पोषण आहाराकरिता मागविण्यात आलेल्या निविदेवरील प्रक्रिया सुरु असून निविदाधारकांची अंतिम यादी आद्याप संम्मत / मान्यताप्राप्त झालेली नाही. संस्थाच्या यादीस अंतिम मंजूरी मिळाल्यानंतर विहित शुल्क आकारुन माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली. शालेय पोषण आहाराकरिता महानगरपालिकेने मागविलेल्या निविदेवरील प्रक्रियापूर्ण होण्या अगोदर अपीलकाराने माहिती मागीतली होती. दि.०४.१०.२००८ रोजी स्थायी समितीच्या मान्यतेनंतर संपूर्ण माहिती निविदाकाराच्या निविदेतून संकलीत करुन द्यावयाची असल्याने माहिती देण्यास वेळ लागला. अपीलकार यांनी दि.१२.०२.२००९ रोजी प्रत्यक्षरित्या कागदपत्राच्या प्रती प्राप्त केल्या असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसते. अपीलकार सुनावणीकरिता हजर नव्हते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २९.०४.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३२१/०२**

**कुमारी.रुपाली आंनदराव जवळकर**
**गुरुनानक नगर, ७ फुट रोड, घाटकोपर (पू),**
**मुंबई ४०० ०७५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा करमणुक शुल्क अधिकारी,**
**उपनगर जिल्हा, अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा**
**यांचे कार्यालय, प्रशाकीय इमारत, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा प्रशासकीय इमातर,**
**प्रशासन वसाहत, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार कुमारी. रुपाली जवळकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०७.१०.२००८ रोजी अर्ज करुन श्री.रामकृष्णन कंचूमर यांच्या विरुध्द होत असलेल्या चौकशी कार्यवाहीची फाईल ही कोणा अधिका-याकडे असून त्या संबंधीत अधिका-यांचे संपूर्ण नावा हुद्या, सद्या कोणत्या कार्यालयात, कोणत्या पदावर कार्यरत आहेत याबाबतची स्वीस्तर लेखी अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिनांक ०२.१२.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. दरम्यानच्या कालावधीत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दिनांक २४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी मुध्देनिहाय खुलासा केला. जन माहिती अधिका-यांनी ५१ दिवस विलंबानी उत्तर दिले. उत्तर दिशाभूल करणारे असल्याचे स्पष्ट केले. तसेच अपीलकारास अर्जातील मुध्दा क्रमांक ४ व ५ बाबत २ दिवसात माहिती द्यावी असे दिनांक ०६.०१.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर जन माहिती

अधिकारी तथा करमणूक कर अधिकारी यांनी १ महिना २० दिवसानंतर पोस्टाने पाठविलेली माहिती साफ खोटी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनवणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.रामकृष्णन कंचूमर यांच्या विरुध्द होत असलेल्या चौकशी कार्यवाहीच्या फाईलसंबंधीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झालेले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी प्रथम सर्व संबंधीत कागदपत्र तपासणी करिता अपीलकारास उपलब्ध करुन द्यावीत. त्यांनतर अपीलकाराच्या मागणीनुसार उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरविण्यात याव्यात.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ च्या भंग झाला आहे. यासाठी जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती का? लादण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

सबब अपील अशंत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २९.०४.२००९.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९३१/०२**

**श्री. श्रीराम द. देशपांडे, ------ अपीलकर्ता**
**८, भास्कर अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**पायलीपाडा, मानखुर्द (पूर्व),सायन,**
**ट्रॉम्बे रोड,मुंबई- ४०० ०८८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन),**
**बृहन्मुंबई दुग्ध योजना, दुग्ध व्यवसाय विभाग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक,**
**बृहन्मुंबई दुग्ध योजना, दुग्ध व्यवसाय विभाग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८. ------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. श्रीराम द. देशपांडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, बृहन्मुंबई दुग्ध योजना, वरळी, मुंबई यांच्याकडे दि.१७.३.२००७ रोजी अर्ज करुन, १) रोखपाल व लेखापाल/ उपलेखापालास रोख रक्कम हाताळणी भत्ता कोणत्या शासकीय आदेशान्वये मंजूर करण्यात आला व रद्द करण्यात आला त्या आदेशाच्या प्रती २) १९९९-२००० या वित्तिय वर्षासाठी वैयक्तिक कर्मचा-यास रोखपाल / उप रोखपालास मंजूरीचे कार्यालयीन आदेश ३) अपीलकाराच्या निवृतपूर्व महिन्यात मासीक वेतनातून एक रक्कमी रू.५, ५३३/- वसूल केले त्या आदेशाची प्रत इत्यादी ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२४.०४.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. मागीतलेली माहिती अंशत: उपलब्ध व अपूर्ण या कारणावरून अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २३.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपिलकाराने एकूण तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती. त्यापैकी अनु.क्र.२ ची पूर्तता झाली आहे असे अपिलकाराने प्रथम अपीलाच्या सुनावणीवेळी मान्य केले. मुद्दा क्र.१ व ३ बाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी दि.१५.७.२००७ पर्यंत द्यावी असे दि.२.७.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या

कारणावरून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, बृहन्मुंबई दुग्ध योजना, वरळी, मुंबई यांच्याकडे दि.१७.३.२००७ रोजी अर्ज करुन, रोखपाल व लेखापाल/ उपलेखापालास रोख रक्कम हाताळणी भत्ता मंजुर केलेले विशेष वेतन पूर्व सूचना न देता वसूल केल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. कामावर आधारित रोख रक्कम हाताळणी भत्ता दर वित्तीय वर्षास प्रशासनाच्या कार्यालयीन आदेशान्वये वैयक्तिक कर्मचा-यास विभाग प्रमुखामार्फत मंजूर करण्यात येत होता. ज्या प्रकरणी रोखपालाच्या पदावर थेट नियुक्ती पूर्वकल्पित आहे त्या प्रकरणी विशेष वेतन अनुज्ञेय असणार नाही. स्वतंत्र संवर्ग निर्माण होण्याजोगी विविध श्रेणी मध्ये पुरेशा संख्येत रोखपालांची पदे विभागात/कार्यालयात असतील तर रोखपाल पदास विशेष वेतन मिळणार नाही. असे आयुक्त, दुग्ध विकास यांनी दि.२०.०१.२००१ रोजी पत्र निर्गमित करून स्पष्ट केले. यासंबंधीची माहिती अपिलकारास देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. पूर्वी अपीलकाराने, लोक आयुक्त महाराष्ट्र यांचेकडे तक्रार केली होती. सदरबाब ही शासकीय धोरणात्मकबाब असल्याचे कळवून लोक आयुक्तांनी प्रकरण बंद केले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-याने पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- २४.०४.२००९**